**थायलंडच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची भेट (30 नोव्हेंबर - 01 डिसेंबर, 2025)**

02 डिसेंबर 2025

थायलंडचे परराष्ट्र मंत्री श्री. सिहासक फुआंगकेतकेओव हे 30 नोव्हेंबर ते 01 डिसेंबर 2025 या कालावधीत भारताच्या औपचारिक भेटीवर होते.

2. 01 डिसेंबर 2025 रोजी परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी थायलंडचे परराष्ट्र मंत्री यांच्यासोबत शिष्टमंडळ-स्तरीय संवादात सहभाग घेतला. परराष्ट्र मंत्री फुआंगकेतकेओव यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल यांची देखील भेट घेतली.

3. उभय मंत्र्यांनी भारत–थायलंड द्विपक्षीय संबंधांचा संपूर्ण आढावा घेतला. ज्यामध्ये राजकीय आदान-प्रदान, संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य, व्यापार व गुंतवणूक, सायबर व डिजिटल क्षेत्र, कनेक्टिव्हिटी, आरोग्य व शिक्षणातील सहकार्य, सांस्कृतिक आणि नागरिक परस्पर संबंध यांचा समावेश होता.

4. त्यांनी परस्पर हिताच्या प्रादेशिक मुद्यांवरही विचारांचे आदान-प्रदान केले. विशेषतः म्यानमारमधील परिस्थितीबाबत, तसेच क्षेत्रात कार्यरत आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी जाळे आणि फसवणूक केंद्रांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवर सहकार्य करण्यासंबंधी चर्चा केली.

5. उभय बाजूंनी भारत–थायलंड धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्याची बाब पुन्हा अधोरेखित केली. इंडो-पॅसिफिक प्रदेशात शांतता, स्थिरता आणि समृद्धी करिता सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्य विस्ताराचा संकल्प केला.

**नवी दिल्ली**

02 डिसेंबर 2025